आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
११ जून २०२५ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

चालू आर्थिक वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेचा वृद्धी दर ६ पूर्णांक ३ दशांश टक्के राहिल असा जागतिक बँकेचा अंदाज

येत्या १५ जुलैपासून रेल्वेचे तत्काळ तिकीट आरक्षित करण्यासाठी प्रवाशांना आधार संलग्न ओटीपी नोंदवणं बंधनकारक

गुंतवणूकदारांना फसवून त्यांना अनधिकृत बँक खात्यात पैसे जमा करायला लावण्याचे प्रकार टाळण्यासाठी सेबी UPI ID सुरू करणार

कोकण, गोवा तसंच दक्षिण भारतात पुढचे तीन चार दिवस जोरदार पावसाची शक्यता

**आणि**

जागतिक कसोटी क्रिकेट स्पर्धेच्या विजेतेपदासाठी लंडनमधे लॉर्ड्स मैदानावर ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका यांची लढत सुरु

<><><><><>

चालू आर्थिक वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेचा वृद्धी दर ६ पूर्णांक ३ दशांश टक्के राहिल असा अंदाज जागतिक बँकेनं वर्तवला आहे. जगातली सर्वाधिक वेगानं वाढणारी अर्थव्यवस्था असण्याचा मान भारत या आर्थिक वर्षातही कायम ठेवेल, असं जागतिक बँकेनं म्हटलंय.

गेल्या आर्थिक वर्षात औद्योगिक विकास दर कमी झाल्यानं देशाच्या आर्थिक वृद्धी दरात अपेक्षित वाढ झाली नाही. पण बांधकाम आणि सेवा क्षेत्राच्या विकासात वाढ झाली. ग्रामीण भागात मागणी वाढल्यानं कृषी क्षेत्राच्या वृद्धी दरात वाढ

झाल्याचं जागतिक बँकेच्या ग्लोबल इकॉनॉमिक प्रॉस्पेक्ट्स रिपोर्ट अहवालात नमूद केलं.

<><><><><>

येत्या १५ जुलैपासून रेल्वेचे तात्काळ तिकीट आरक्षित करण्यासाठी प्रवाशांना आधार संलग्न ओटीपी नोंदवणं बंधनकारक असणार आहे. IRCTC ॲप किंवा IRCTC वेबसाइटवरुन तत्काळ तिकीट आरक्षित करताना प्रवाशांचा आधार संलग्न ओटीपीची नोंद करणं आवश्यक असेल. रेल्वेनं आज यासंदर्भातलं पत्रक प्रसिद्ध केलं. याशिवाय ज्या खात्यावरुन तत्काळ तिकीट आरक्षित केले जाणार आहे ते खातं देखील आधार संलग्न असणे आवश्यक असेल. याची अंमलबजावणी १ जुलैपासून होणार आहे.

तिकीट खिडकी किंवा रेल्वेच्या अधिकृत एजंटकडून तात्काळ तिकीट आरक्षित करताना तिकीट काढण्यासाठी दिलेल्या मोबाइल क्रमांकावर आलेला ओटीपीची पडताळणी १५ जुलैपासून आवश्यक असेल.

तात्काळ तिकीटांचं आरक्षण सुरू झाल्यावर पहिल्या अर्धा तासात रेल्वे एजंटांना तत्काळ तिकीट आरक्षित करता येणार नाही, असा निर्णयही रेल्वे मंत्रालयानं आज जाहीर केला.

<><><><><>

गुंतवणूकदारांना फसवून त्यांना अनधिकृत बँक खात्यात पैसे जमा करायला लावण्याचे प्रकार टाळण्यासाठी सेबीनं नवीन प्रणाली विकसित केली आहे. यानुसार अधिकृत बँक खात्याची ओळख दर्शवणारे UPI ID सुरू केले जाणार आहेत. शेअर दलालांच्या अधिकृत युपीआय आयडीमध्ये brk तर म्युच्युअल फंडांच्या अधिकृत युपीआय आयडीमध्ये mf असा उल्लेख असेल. याशिवाय वैध युपीआय आयडी दर्शवताना हिरव्या त्रिकोणात अंगठ्याचं चिन्ह दिसेल. यावरुन हा युपीआय आयडी

अधिकृत आहे, हे ग्राहकांना लक्षात येईल. ऑक्टोबरपासून ही सुविधा सुरू होणार आहे.

**<><><><><>**

कल्याणकारी विकासासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज म्हटलं आहे. कामगार आणि रोजगार मंत्री डॉ. मनसुख मांडवीय यांच्या समाजमाध्यमावरच्या संदेशाला उत्तर देताना प्रधानमंत्र्यांनी, सरकारनं सुरू केलेल्या विविध कल्याणकारी योजना जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहोचतील, याची खात्रीही दिली.

भारताचं सामाजिक सुरक्षा कवच गेल्या दहा वर्षांमध्ये १९ टक्क्यांवरून ६४ पूर्णांक ३ दशांश टक्क्यापर्यंत वाढलं आहे. आयलोस्टॅट या आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या ताज्या आकडेवारीनुसार, गेल्या दशकात ४५ टक्के वाढ दिसून आली आहे. भारतातले ९४ कोटींहून अधिक जणांना आता किमान एका सामाजिक संरक्षणाचा लाभ मिळत आहे. सामाजिक संरक्षण मिळणाऱ्या लाभार्थ्यांच्या संख्येच्या बाबतीत भारत आता जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे.

जिनिव्हा इथे आंतरराष्ट्रीय कामगार परिषदेत आयलोस्टॅटच्या महासंचालकांशी द्विपक्षीय चर्चा करताना कामगार आणि रोजगार मंत्री डॉ. मनसुख मांडवीय यांनी गेल्या अकरा वर्षांत मोदी सरकारने हाती घेतलेल्या कल्याणकारी योजनांची माहिती दिली. ही कामगिरी प्रधानमंत्र्यांच्या दूरदर्शी नेतृत्वाची, तसंच समावेशक आणि हक्कांवर आधारित सामाजिक संरक्षण परिसंस्था निर्माण करण्यासाठी सरकारच्या अथक प्रयत्नांची साक्ष देते, असं मांडवीय यावेळी म्हणाले. आयलोस्टॅटचे महासंचालक गिल्बर्ट एफ. हॉंगबो यांनी गरीब आणि कामगार वर्गासाठी भारताने सुरू केलेल्या कल्याणकारी धोरणांबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं कौतुक केलं आहे.

**<><><><><>**

गेल्या अकरा वर्षांमध्ये पायाभूत सुविधांमध्ये केंद्र सरकारने केलेल्या क्रांतीमुळे भारताचं नवनिर्माण झालं आहे असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी समाजमाध्यमावर म्हटलं आहे. नवनवीन अत्याधुनिक पायाभूत सुविधांमुळे देशाची एकात्मता आणि मजबूती यात भर पडली असून, व्यापार आणि आर्थिक व्यवहार पूर्वीपेक्षा कितीतरी अधिक वेगवान झाले आहेत असं शाह यांनी नमूद केलं आहे.

**<><><><><>**

केंद्रीय मंत्रीमंडळानं आज २ रेल्वे प्रकल्पांच्या दुपदरीकरणाला मंजुरी दिली. झारखंडमधला कोडर्मा - बारकाकाना आणि कर्नाटकातला बल्लारी ते आंध्र प्रदेशातला चिकजाजूर या मार्गांचा यात समावेश आहे, असं माहिती प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. या दोन्ही प्रकल्पांसाठी सुमारे साडे ६ हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. येत्या ३ वर्षात हे काम पूर्ण होईल, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

विकसित कृषी संकल्प अभियानांतर्गत कृषी विज्ञान केंद्र परभणी आणि वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या वतीने परभणी जिल्ह्यामध्ये पूर्णा तालुक्यात आव्हाई इथे शेतकरी संवाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात शेतकऱ्यांना स्थानिक पातळीवर पिकणाऱ्या नगदी पिकांविषयी शास्त्रज्ञांनी संपूर्ण मार्गदर्शन केलं. या कार्यक्रमाविषयी परभणीचे शेतकरी जळबाजी बुचाले यांनी अधिक माहिती दिली.

**होल्ड बाईट - जळबाजी बुचाले**

कृषी विभाग सांगली तसंच आत्मा प्रकल्प सांगली यांच्या संयुक्त प्रयत्नातून मिरज तालुक्यात शिपूर इथंही “कृषी संकल्प अभियान” आयोजित करण्यात आलं.

**<><><><><>**

मान्सून साधारणपणे येत्या आठवड्यात सक्रिय होईल. कोकण, गोवा तसंच दक्षिण भारतात  काही ठिकाणी १२ ते १६ या कालावधीत जोरदार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. मराठवाड़ा, छत्तीसगढ, अंदमान निकोबार, तमिळनाडू तसंच पुद्दूचेरी कराईकल आदी भागात वीजांच्या कडकडाटासह जोरदार वारे वाहतील तर देशाच्या  वायव्येकडील भागात तसंच पश्चिम हिमालयीन प्रदेशांमध्ये उष्णतेची लाट असेल अशी शक्यता भारतीय हवामान खात्यानं वर्तवली आहे.

<><><><>

जागतिक कसोट क्रिकेट स्पर्धेच्या विजेतेपदासाठी, आज लंडनमधे लॉर्ड्स मैदानावर ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका यांचा सामना सुरु झाला. दक्षिण आफ्रिकेनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला. ऑस्ट्रेलियाची सुरुवात खराब झाली. त्यांचे आघाडीच्या फळीतले फलंदाज झटपट बाद होत गेले. उपाहारापर्यंत त्यांनी ४ गडी गमावून ६७ धावा केल्या. सलामीवीर उस्मान ख्वाजाला तर भोपळाही फोडता आला नाही. मात्र त्यानंतर स्टीव्हन स्मिथनं ब्यू वेबस्टरच्या साथीनं डाव सावरला. स्मिथ ६६ धावा करुन बाद झाल्यानंतर वेबस्टरनं दमदार फलंदाजी सुरु ठेवली. चहापानापर्यंत ऑस्ट्रेलियानं ५ बाद १९० धावा केल्या.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा ऑस्ट्रेलियाच्या ६ बाद  १९२ धावा झाल्या होत्या.

<><><><>

विम्बल्डन स्पर्धेतली गतविजेती बार्बरा क्रेजसिकोवाला WTA 500 स्पर्धेच्या महिला एकेरीत पराभवाचा सामना करावा लागला आहे. स्लोवाकियाच्या रिबेका स्रमकोवा हिनं तिचा ६-४, ६-३ असा पराभव केला.  बार्बरानं चांगली सुरुवात केली होती, मात्र सव्वा तास चाललेल्या या सामन्यात अखेर रिबेकानं तिला हरवलं.

<><><><>

भारत सरकार इटालियन कंपन्यांसाठी “होम अवे फ्रॉम होम” या संकल्पनेवर आधारित समर्पित औद्योगिक वसाहती विकसित करणार आहे. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी इटली दौऱ्यादरम्यान ही माहिती दिली. राज्यात या वसाहतींसाठी रायगडमधलं दिघी आणि छत्रपती संभाजीनगर इथल्या ऑरिक सिटीची निवड करण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगरमधील ऑरिक सिटीचा विस्तार सुमारे आठ हजार एकरांपर्यंत करण्याचा प्रस्ताव सरकारने तयार

केला असून, या विस्तारीकरणात इटालियन कंपन्यांसाठी स्वतंत्र क्लस्टरची रचना केली जाणार आहे. इथं होणाऱ्या गुंतवणुकीमुळे स्थानिकांना रोजगाराच्या संधी मिळतील तसंच पायाभूत सुविधा अधिक विकसित होतील, असा विश्वास वर्तवला जात आहे.